# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०६/०१/२००७
## (दि. ०३/०१/२००७ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. ०३/०१/२००७ रोजीची तहकुब झालेली स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०६/०१/२००७ रोजी सभा सुचना क्र. २४ दि. २८/१२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ११) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १२) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १३) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १४) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| २) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडेल अशी मी आशा बाळगते व सभा सुरु करण्यासाठी मा. सचिवांना आदेश देतो.

(नगरसचिवांनी परिपत्रकाचे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मागील सभेमध्ये सन्मा. सदस्य श्री जयंत पाटील ह्यांनी श्री. घेवारेंबाबत विषय चर्चेला काढला होता. त्याबाबत माहिती देतेवेळी सभा दोन वेळा तहकुब झालेली होती. तद्नंतर जेवण वगैरे वेळेवर आले नाही. म्हणून आपण सभा तहकुब करुन निघालो.

**मा. सभापती :-**

आपल्या विषयपटलावरील विषय घेउ. त्याच्यानंतर आपण मा. आयुक्त साहेबांसोबत बसून रितसर चर्चा करु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्याच संदर्भात एक दुसरा प्रश्न होता. मी पाण्याबाबत वारंवार तक्रार केलेली आहे. एकदा मा. आयुक्त साहेबांकडे पण गेलो होतो. पाणी समस्या ही वाढत चाललेली आहे. त्यावर प्रशासन काय .............

**मा. सभापती :-**

आपण नंतर रितसर चर्चा करु.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १५९ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, वृक्षप्राधिकरण समितीने जी सभा घेतली त्या सभेने सादर केलेल्या पुर्नविनियोजनामध्ये प्रदर्शन भरविणे आणि ग्रीन हाउस बांधणे याकरिता रु. २५ लाख खर्च येणार आहे असे दिलेले आहे. साहेब, हा एवढा खर्च कसा काय? याच्या काही डिटेल्स आपल्याकडे आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. स भापतींच्या मंजुरीने बोलतो. ती, तरतुद होती. परंतु, तो खर्च आपण करत नाही. त्याच्यापेक्षा कितीतरी कमीने आपण ग्रीन हाउसचे तर आपण यावर्षी केलेले नाही. या तरतुदीमधून इतर विकास कामे करण्यासाठीचे हे पुर्नविनियोजन आहे.

**जयंत पाटील :-**

खर्च येणार आहे तिकडे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यात खर्च येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, यामध्ये प्रदर्शन भरविणे म्हटले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रदर्शन भरविणे, ग्रीन हाउस बांधणे यासाठी रु. ४० लाखाची तरतुद केलेली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, प्रदर्शनाला ॲक्चुअल खर्च किती?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ग्रीन हाउस बांधण्यासाठी रु. २५ लाख खर्च येणार असून उर्वरित शिल्लक रु. १५ लाख वर्ग केले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, प्रदर्शनावर ॲक्चुअल खर्च किती आला? आपण हा जो ६ लाख रुपयांचा माहितीपट (डॉक्युमेंट्री) तयार करतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इतर महासभेमध्ये केल्याप्रमाणे आपण जी मा. महासभेची डॉक्युमेन्ट्री तयार करतो. एका विषयाला साधारणतः दोन लाख रुपये खर्च आहे. शहराच्या गार्डन्स वगैरेचा त्याच्यामध्ये समावेश केला जाणार आहे. जशी आपण घनकचऱ्याची डॉक्युमेन्ट्री केली तो विषय वेगळा. त्याच्यासाठी ६ लाख आणि रु. २१ लक्ष इतर तीन चार गार्डन्ससाठी, मिरा रोड शांतीनगर येथे आपल्याला जो ओपन स्पेस मिळालेला आहे. तर ते आपल्याला विकसित करायचे आहे. त्याच्यासाठी हा निधी वर्ग करायचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमचे म्हणणे एवढेच आहे की, जो माहितीपट ६ लाख रुपये आहे आणि आता जे प्रदर्शन चालू आहे त्याचा अंदाजे खर्च किती?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साडे आठ लाख रुपये प्रदर्शनाचा खर्च आहे. आपण ४० लाख रुपये ठेवला होता. त्यापैकी फक्त साडे आठ लाखमध्ये आपण खर्च करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साठे आठ लाख प्रदर्शनाचा खर्च म्हणजे प्रदर्शनामध्ये आपण काय केले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रदर्शनामध्ये आपण शासनाचे विविध स्टॉल बोलावलेले आहेत. त्यांचे कर्मचारी तीन दिवस ह्या ठिकाणी राहणार आहेत. शहरातील शाळांचा समावेश आपण घेतलेला आहे. त्याच्यासाठी प्रशस्तीपत्र आणि मेडल्स आपण केलेले आहेत आणि नर्सरीधारक आहेत त्यांना बोलावलेले आहे. तीन दिवस त्या ठिकाणी स्टे, पेन्डॉल, त्या ठिकाणची लाईटिंग, माईक व्यवस्था, त्या अनुषंगाने आवश्यक असलेली जाहीर प्रसिध्दी आपल्याकडे साडेबारा लाखाच्या निविदा आल्या होत्या. आम्ही त्या मान्य केलेल्या नाहीत. आणि आपल्या स्तरावर आपण ते कमी खर्चाने करत आहोत. त्या हेडमधून जी रक्कम शिल्लक राहते ती मिरारोडला जे चार गार्डन्स आपल्याला डेव्हलप करायचे आहेत. त्याच्यासाठी हा निधी वर्ग करायचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण जे प्रदर्शन भरवतो, आपण जे स्टॉल्स बोलावतो. तर ते स्टॉलवाले आपल्याला भाडे देतात. मग हे उलटे आहे. आपण स्टॉल्सना पैसे दिले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे आपले पहिले वर्ष आहे. निश्चितच पुढच्या वर्षी आपल्याला ह्यामध्ये कुठलाही पैसा खर्च न करता चांगल्या पध्दतीने प्रदर्शन भरवता येईल.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, लेकिन मिरा रोड मे जो चार गार्डन्स नया करने के लिए खर्चा करना है। उसका उल्लेख इसमे नही है। तो उसका अलगसे करो ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो निधी जो वापरला जाणार आहे ..........

**हंसुकुमार पांडे :-**

उसमे से बचा हुआ पैसा? लेकिन बचे हुए पैसे का इसमे दिया नही है।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आहे ना. २१ लाख रुपये जे आहेत ते वृक्षारोपण या लेखाखाली विकास कामासाठी वापरला जाणार आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, उरलेला जो निधी आहे तो मिरारोड विभागामध्ये आपण वापरणार आहात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा रोडमध्ये असे नाही. त्या ठिकाणी शांतीनगरमध्ये जे वेगवेगळ्या विकास कामामधील ओपन स्पेस आहेत. ते आपल्याकडे हॅन्डओव्हर झालेले आहेत.

**रतन पाटील :-**

मी त्याच संदर्भात बोलतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तिथे अतिक्रमण होउ नये. लोकांना सुविधा मिळावी.

**रतन पाटील :-**

आत्ता नवघर विभागामध्ये बरीचशी जागा महापालिकेकडे हस्तांतरित झालेली आहे. तर सगळा निधी तिथे न वापरता अर्धा निधी नवघर विभागामध्ये गार्डन्ससाठी वापरावा. एकाच ठिकाणी एवढा कशाला? ह्या बाजुला डेव्हलप करुन घ्या.

**हंसुकुमार पांडे :-**

बरोबर आहे. आर.एन.पी. पार्कला सुध्दा गार्डन आहे. तिकडे करा.

**रतन पाटील :-**

आमच्या बाजुला गार्डन्स नाहीत तिकडे जरा करा. असे करा.

**हंसुकुमार पांडे :-**

अभी जो ठराव होगा उसके अंदर समावेश कर लिजिए।

**रतन पाटील :-**

एकाच ठिकाणी करु नका. थोडा या बाजुला घ्या आणि थोडा या बाजुला डेव्हलप करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठिक आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

आर.एन.पी. पार्कला जे गार्डन आहे. त्याला डेव्हलप करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटलांनी जे सांगितले ते नमुद करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझ्या माहितीप्रमाणे आत्ताच ऑक्टोंबरमध्ये वृक्षप्राधिकरणाचे बजेट झाले, हे खरे आहे का? याचा प्रशासनाने खुलासा केला तर बरे होईल. नाहीतर दुसऱ्या महिन्यातच तुम्हाला पुर्नविनियोजन करावे लागते.

**मा. सभापती :-**

आजचे विषय संपल्यानंतर जी चर्चा आहे तेव्हा आपण चर्चा करुन घेउ.

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने याच्यावर गोषवारा का दिला नाही? त्यांनी ठराव केला तसाच दिला आहे.

**मा. सभापती :-**

गोषवारा दिला नाही का?

**शशिकांत भोईर :-**

वृक्षप्राधिकरण समितीचा जो ठराव झाला तोच ठराव त्यांनी दिलेला आहे. त्यांनी आपल्याला गोषवारा कुठे दिला आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. पुर्नविनियोजन करण्याबाबतचा वृक्षप्राधिकरणाचा जो प्रस्ताव आहे त्याचा गोषवारा अपुर्ण आहे. कुठल्या पध्दतीने त्यांनी डिटेल दिलेले आहे की, आपण कुठे खर्च करणार आहोत? कशासाठी करणार आहोत? त्याचे पुर्ण डिटेल्स काहीच नाहीत. तर मला वाटते, त्याचा गोषवारा आणण्यासाठी हा विषय त्यांनी पुढील सभेत पुर्ण गोषवाऱ्यासहित आणावा अशी माझी आपल्याला विनंती आहे. त्यांनी काहीच दिलेले नाही. फक्त तुम्ही याच्यासाठी एवढी इथे वर्ग करा, तिथून तिथे वर्ग करा असेच फक्त दिले आहे.आपल्याकडे काय असेल तर त्याचे डिटेल्स सांगा किंवा कोणी तसा असेल तर. तसे काही मला दिसत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे. वृक्षप्राधिकरण समितीचा जो ठराव आहे. त्याच्या खाली माझी सही आहे. फक्त एवढेच की, आपण टेब्युलर फॉर्मवर दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे. पण साहेब आमची तुम्हाला सुचना अशी आहे की, जी तुम्ही डॉक्युमेन्ट्री भरवणार आहेत. त्या डॉक्युमेन्ट्रीची डिटेल्स ........

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डॉक्युमेन्ट्री भरविणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही तयार करणार आहात त्याची थोडी डिटेल्स सांगा आणि तुमचा जो प्रदर्शनाचा खर्च झालेला आहे ते काय आहे? म्हणजे पुढच्या वेळेला तुम्ही थोडेसे डिटेल्स आणले तर बरे होईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रदर्शनाच्या खर्चासाठी ही मंजुरी नाही. कृपा करुन गैरसमज नको. आमच्याकडे प्रदर्शनाची तरतुद आहे. ती जास्तीची तरतुद आहे आणि त्यातून जो निधी शिल्लक राहणार आहे. तो आपल्याला इतर विकास कामाला वर्ग करावयाचा आहे. वास्तविक ही मान्यता वृक्षप्राणिकरण समितीने दिलेली आहे. तरी पण ते स्थायी समितीमध्ये व्हायला पाहिजे असा माझा नियमाप्रमाणे आग्रह असल्यामुळे आपण तो विषय इथे आणला आहे. ते विधी डिपार्टमेन्टमध्ये वर्गीकरण आहे. आम्ही बाहेरचे पैसे घेत नाही. सन्मा. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यामध्ये नवघरच्या कामांचा समावेश करुन हा विषय अंतिम केला जाईल आणि आपण जो डॉक्युमेन्ट्रीसाठी बोलता. आपण आपल्याकडे ऑलरेडी घनकचरा व्यवस्थापनाची डॉक्युमेन्ट्री केलेली आहे. सदरची डॉक्युमेन्ट्री यशदा, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सबमिट केली आहे. मिरा भाईंदर हरित भाईंदर राहण्यासाठी आपल्या सर्वांच्या संकल्पना, त्याच्यामध्ये मा. महापौरांचे, मा. सभापतींचे, शहरातील नागरिकांचे टॉक येणार आहेत आणि असलेली सर्व गार्डनची स्थिती, परिसरांचा भाग त्याच्यामध्ये शुटींग केला जाणार आहे. म्हणजे भविष्यात तो आपल्याला एक बेस असतो की, आपल्याला त्याच्यानंतर पुढे काय करायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या डॉक्युमेन्ट्रीचा आपल्याला फायदा काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्या पुस्तकाचा फायदा काय बोलले तर कसे होईल? तो आपला एक स्टेटस असतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पुस्तक जर आपण लोकांना वाचायला दिले तर...

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो एक एव्हीडन्स असतो.

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिकेची जी डॉक्युमेन्ट्री तयार केली जाते. ती प्रत्येक डिपार्टमेंटची किंवा पूर्ण शहराची माहिती असते. आता उदाहरणच द्यायचे झाले तर मध्यंतरी आपण घनकचऱ्याच्या बाबतीत एक डॉक्यूमेंन्ट्री फिल्म तयार केली होती. आणि त्याचा बेस, संपूर्ण शहरामध्ये आपली जी व्यवस्था आहे. ती व्यवस्था आपण संकलीत करुन जनतेसमोर ठेवतो किंवा दुसरा महत्त्वाचा मुद्दा की, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाच्या अंतर्गत आपल्या महापालिकेला एक पारितोषीक मिळाले. ते पारितोषिक जे आपल्याला मिळालेले आहे तर आपण कोणते चांगले काम केले आहे. ते काम त्या डॉक्युमेन्ट्रीमध्ये दाखवून ती डॉक्युमेंन्ट्री आपण शासनाकडे पाठवलेली आहे. जेणेकरुन जेव्हा बक्षिस समारंभ होईल, तेव्हा आपले नाव पुकारल्यानंतर आपल्या

महापालिकेला त्या ठिकाणी हायलाईट केले जाणार आहे. म्हणजे आपल्या शहरामध्ये काय चालते हे इतरांना पण कळेल.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब लेकिन जो आपने यहाँ पेड लगते है। आप बोलते है हरित भाईंदर चाहिये। तो अभी जो पेड लगते है। उनकी देखभाल तो होती नही है। उसको कभी खतपानी होता नही। एक बार झाड लगाकर चले गये तो उसके बाद मे कोई देखने नही आता। हम लोग श्री. गणेश पाटील साहब को कम्प्लेंट देकर थक गये। उसके उपर कुछ देखभाल होती नही तो हरित कैसे रहेगा? एक बार लगाने से कुछ नही होता है। उसको खतपानी कुछ नही होता है।

**जयंत पाटील :-**

आमचा कार्यक्रम फक्त झाड लावणे आहे. त्याला वाढवणे नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

आणि आपले कुठले झाड अजून वाढले आहे? दस टका, पंधरा टका भी झाड बढा नही है।

**जयंत पाटील :-**

गेल्या पंधरा वर्षामध्ये अनेक झाडे लावली. ती झाडे आहेत कुठे?

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, आपला फुकटचा खर्च आहे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी आपल्याला माहिती देउ इच्छितो की, गेल्या तीन-चार वर्षापासून आपण अशा प्रकारची झाडे लावलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे जवळ-जवळ तीन वर्षांचे एक टेंडर मागच्या वेळेला दिलेले होते. आणि ज्या प्रमाणामध्ये ते झाडे लावतील, झाडे जगवतील त्याप्रमाणे आपण त्यांना मेहनताना देणार होतो. हा जो आपला सर्व्हे आहे किंवा जो सर्व्हे आपण केलेला आहे, आतापर्यंत आपण शहरामध्ये एकूण किती झाडे लावली? त्याच्यापैकी किती जगली? याचे सगळे डिटेल्स आपल्याकडे आहेत.

**हंसूकूमार पांडे :-**

आहेत तर जरा दाखवा. तीन वर्ष झाली ठेका देउन आपण किती झाडे लावली त्यापैकी जगलेली झाडे किती आहेत? मला तर वाटत नाही की पंचवीस टक्के झाडे पण जगलेली आहेत. आम्ही बघतो म्हणून आम्ही सांगतो.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, ह्या संदर्भामध्ये सन्मा. सदस्यांना झाडे जगली किती, लावली किती, ही माहिती लेखी स्वरूपामध्ये सगळ्यांना देतो.

**जयंत पाटील :-**

कुठल्या एरियामध्ये किती झाडे लावली? कुठल्या रोडवर किती झाडे आहेत? किती झाडे लावली? किती झाडे जगली? आत्ता नारळाची झाडे लावली आहेत. तर ते नारळ कोण खाणार तेच कळत नाही. झाडे लावल्याचे दुःख नाही. पण ती झाडे जगली कुठे?

**हंसुकूमार पांडे :-**

साहब, चौपाटीपर भी थोडा झाड लगाने के लिये श्री. गणेश पाटील साहब को बोलिए। वहाँ पर भी सुंदरीकरण होना जरुरी है। इतना अच्छा तीन किलोमीटर का चौपाटी है। वह भी सुंदर होना चाहिये। उस दिन पानपोई के लिए कमिश्नर साहेब का परवानगी लिया। लेकिन उसका कुछ भी हुआ नही है। साहब, उस दिन हमने आपसे प्याउ का परमिशन लिया। उसके बारे मे बाद मे कुछ हुआ नही।

**मा. आयुक्त :-**

उसका ठराव आया नही है।

**हंसुकूमार पांडे :-**

उस दिन तो इधर ठराव हो गया था।

**मा. आयुक्त :-**

मिटींग मे हो गया। अभी तक मेरे पास आया नही है।

**हंसुकूमार पांडे :-**

आयेगा तो जरा उसके उपर गौर करके खत्म करो।

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केलें.)

**जेन्वी अल्मेडा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. १५९ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (वृक्षप्राधिकरण समिती सभा दि. ०४/१२/२००६ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. ५४)

**ठराव क्र. १६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामध्ये झाडे लागवड करणे, नव्याने नर्सरी मध्ये रोपटी तयार करणे, नविन उद्याने लॅन्ड स्केपींग करणे, स्मशाने, चौपाट्या यावर शोभिवंत व झाडांची लागवड करणे, रोडच्या मध्यभागी डिवायडर गार्डन बनविणे केलेल्या वृक्षारोपनावर व करत असलेल्या वृक्षारोपणावर खर्च करणे असून वृक्षारोपण या सदराखाली ९०.०० लाखाची तरतुद केलेली असून त्या तरतुदीमधून रु. ५,४०,५९२/- इतकी शिल्लक असुन या विभागाकडून वरील कामी खर्च करावयाचा बाकी आहे.

फळे, फुले, औषधी वनस्पती इ. प्रदर्शन भरविणे व ग्रीन हाउस बांधणे या लेखाशिर्षाखाली रक्कम रु. ४०.०० लाख इतकी तरतुद केलेली असून या तरतुदीमधुन प्रदर्शन भरविणे व ग्रीन हाउस बांधणे याकरिता अंदाजे २५.०० लाख इतका खर्च येणार असून उर्वरित शिल्लक तरतुद रु. १५.०० लाख वृक्षारोपण या लेखाशिर्षाखाली वर्ग केल्यास वरील कामे करणे शक्य आहेत. तसेच वाहनखरेदी या शिर्षाखाली चालु अंदाजपत्रक रु. २०.०० लाखाची तरतुद केलेली असुन १४.०० लाख खर्च झालेला आहे व वृक्षारोपण या सदराखाली हरित क्रांती डॉकिमेंट्री (माहितीपट) तयार करणेकामी रु. ६.०० लाख खर्च होणार आहे. असा एकुण २१.०० लाख वृक्षारोपन या लेखाशिर्षात वर्ग करणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची ड प्रकरण ७ मधील कलम २ नुसार मा. स्थायी समिती सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६० चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण कम्प्यूटरची भरती करायची होती. आता प्रत्येक डिपार्टमेंटला कम्प्यूटर आलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे प्रतिदिन चा ठराव झालेला आहे. आत्ता आपण कर्मचाऱ्यांना किती रोज देणार?

**शशिकांत भोईर :-**

ठेकेदाराला आपण २१५/- देणार.

**मा. सभापती :-**

२१५/- देणार.

**जयंत पाटील :-**

ठेकेदार त्या लघुलेखकाला किती देणार? त्याने किती द्यायला पाहिजे?

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे ज्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या निविदा आपण ठेकेदाराकडून मागविलेल्या आहेत. कर्मचाऱ्यांना त्याने किती द्यायचे त्याच्या बद्दल आपण उल्लेख केलेला नाही.

**जयंत पाटील :-**

उल्लेख व्हायला पाहिजे ना?

**मा. आयुक्त :-**

कशाला व्हायला पाहिजे? उल्लेख व्हायला नको.

**जयंत पाटील :-**

त्याने त्याला किती द्यायचे?

**मा. आयुक्त :-**

त्यांना किती द्यायचे ते ठेकेदार ठरवेल. आपल्याकडे ज्या निविदा आलेल्या आहेत. त्या बाबतीमध्ये आपण विचार करायचा.

**जयंत पाटील :-**

मागे आपण पन्नास लिपीक मागवले होते. ज्यांना आपण आता बाहेर काढलेले आहे. पन्नास लिपीकांचा जो दर आपण ठरवला होता. तो मला वाटते रु. १२८/- होता.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे त्यांना आपण दिले.

**जयंत पाटील :-**

आपण रु. १२८/- दिले आहेत. ठेकेदाराने काय केले की, पन्नास जणांचे त्याने सत्तर - पंच्याहत्तर वाढवले. आपल्याला त्याची माहिती नाही आणि हे संपुर्ण डिस्ट्रीब्युशन त्याने सत्तर जणांत केले.

**मा. आयुक्त :-**

पन्नास लिपीक जे आपण घेतलेले होते, ते सुध्दा अशाच पध्दतीने केले होते म्हणजे एका पुरवठादाराकडुन ते आपण उपलब्ध करुन घेतले होते.

**जयंत पाटील :-**

बरोबर आहे.आपण ठेकेदाराकडुनच घेतले होते. ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना किती रेट द्यायचा हे आपण ठरवले पाहिजे. सफाई कामगारांना त्यांनी तेवढे पेमेंट दिले पाहिजे तसे होत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मागे तुम्ही मध्यस्थी केली होती. आता आपल्या सी. एफ. सी मध्ये जे संगणक चालक आहेत. ते सगळे तुमच्याकडे आले होते आणि तुम्ही त्यांना रु. ३,५००/- द्या असे कम्प्लशन ठेकेदारांना केले होते.

(सन्मा. सदस्या सौ. जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. १६० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर .

**प्रकरण क्र. १६०**

लघुलेखक पुरवठा कामी आलेल्या निविदेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १६३ :-**

नगरसचिव विभागाकरिता ठेका पध्दतीने ६ (सहा) लघुलेखक (स्टेनो) पुरवठा करणेबाबत ''दै. जन्मभुमी गुजराती'' व ''दै. सुरजप्रकाश'' या वृत्तपत्रामध्ये पुरवठादारांकडून जाहिर निविदा मागविणेंत आल्या होत्या. निविदा सादर करावयाच्या मुदतीत खालील निविदाधारकांनी आपले दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **सादर केलेले दर (प्रति दिवस प्रति लघुलेखक)** |
|---|---|---|
| १) | मे. ध्रुव एन्टरप्रायजेस | रु. २१५/- |
| २) | मे. के. जी. एम. कॉम्प्युटर | रु. २२२/- |
| ३) | मे. निलेश क्रिएशन | रु. २२५/- |

वरीलपैकी तुलनात्मक दरपत्रक पाहता ''मे. ध्रुव एन्टरप्रायजेस'' यांची रु. २१५/- प्रती दिवस प्रती लघुलेखक ही सर्वांत कमी दराची निविदा आहे. तरी मे. ध्रुव एन्टरप्रायजेस यांची सर्वात कमी दराची निविदा मानधनावर लघुलेखक नियुक्ती होईपर्यंत स्विकारणेस व ''मे. ध्रुव कॉम्प्युटर्स'' ह्यांनी त्यांची मुदत संपलेनंतरही दि. १६/०९/२००६ ते दि. ३१/१२/२००६ या कालावधीकरिता लघुलेखक पुरवठा केल्याचे देयक अदा करणेंस ही मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

( नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६१ चे वाचन केले. )

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे जे कम्प्युटर खरेदी केले आहेत. आणि जे टेंडर आले आहेत. मा. आयुक्त साहेब, हे जे कम्प्युटर आपण मागवले आहेत. ह्याच्यामध्ये कम्प्युटरचा रेट आहे. रु. ३५,८७५/- आणि प्रिंटरचा रेट आहे. २५,७००/- हा रेट खुप जास्त आहे. कम्प्युटरची ॲक्च्युअल किंमत रु. २५,०००/- आहे आणि जो प्रिंटर आहे त्याची किंमत साधारण साडे - बारा हजार रुपये आहे. आणि साहेब याच्यामध्ये दुसरे पण असे असते की, ह्या ज्या ऑपरेटींग सिस्टम असतात त्याचे लायसन्स आपल्याला लागते. उद्या जर त्या कंपनीने आपल्या इथे रेड टाकली तर आपले कम्प्युटर ते सीझ करु शकतात. कारण त्यांचे जे सॉफ्टवेअर आपण युज करतो. त्याचे लायसन्स घ्यावे लागते. आणि आपल्याला जो कम्प्युटर सप्लाय करतो. त्याने ते लायसन्स आपल्याला दिले पाहिजे ते सीझ झाले तर आपला सगळा खर्च पाण्यात जाईल.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे आपली कामेच होणार नाहीत.

**मा. सभापती :-**

माहिती आणतात तोपर्यंत पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, प्रकरण क्र. १६१ चा नंतर विचार करावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६२ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

विषय मंजुर .

**प्रकरण क्र. १६२ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १६४ :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक रेबीज प्रतिबंधक लस पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे. न्युरेज केमिस्ट, मे. पंकज मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स, मे. राधे केमिस्ट, मे. राज केमिस्ट या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यांनी निविदेत खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| लसीचे नाव | मे. न्यु रेज केमिस्ट | मे. पंकज मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स | मे. राधे केमिस्ट | मे. राज केमिस्ट |
|---|---|---|---|---|
| रेबीज प्रतिबंधक लस | रु. ३३२/- प्रति लस | रु. ३३८/- प्रति लस | रु. ३४०/- प्रति लस | रु. ३३६/- प्रति लस |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. न्यु रेज केमिस्ट यांनी रेबीज प्रतिबंधक लस पुरवठा करणेकामी सादर केलेले दर तिन्ही निविदाकारांच्या तुलनेत कमी आहे. मा. आयुक्त यांनी मे. न्यु रेज केमिस्ट यांनी सादर केलेली निविदेतील दर मंजुर केले आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मंजुरी दिलेली आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६३ चे वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीने बोलतो, साहब इसमे जो रेट लिखा है वह रेट डब्बल कोट किया है। जैसे सिरींज एक बॉक्स का रु. २५०/- होना चाहिये जो उसका रु. ६८९/- है। इट इज ऑलरेडी थ्री टाईम तो इतना रेट होने से अपने महानगरपालिकाका हर तरफ से नुकसान है। इसमे अपना पैसा जायेगा। खर्च अपना होनेवाला है। इसमे स्टिकींग प्लॅस्टरका रेट है। उसी कंपनी का रु ५००/- मे आता है। उसका रेट इधर रु. १,०००/- लिखा है। तो यह कैसे हो सकता है?

**रुन्दन राठोड :-**

मा. सभापती महोद्यांच्या परवानगीने बोलतो, यापैकी एकही रेट हे एम.आर.पी वर नाही आणि स्टॅंडर्ड कंपन्याचे आहेत. त्यामुळे थोडे जास्त रेट आहेत.

**हंसुकूमार पांडे :-**

पण त्याच कंपनीचा रेट कमी आहे. आम्ही त्याचा रेट काढला. तुम्ही रु. ६८९/- चा रेट दिलेला आहे त्याचा रु. २५०/- रेट आहे आम्ही रेट काढुन आलो म्हणुन तुम्हाला बोलातो उगाचच बोलत नाही.

**रुन्दन रोठोड :-**

कंपन्यांच्या स्टँडर्ड वर असते आणि एवढा फरक असेल असे मला वाटत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, फरक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डॉक्टर साहेब, आता आपण एवढे वर्ष झाले प्रॅक्टिस करता. आपला अनुभव काय आहे? एखादे मेडिसीन किंवा एखादी सिरींज एम. आर. पी मध्ये आहे. तुम्हाला असे वाटत नाही की, मॅन्युफॅक्चरिंग कंपनी आहे ही २०० टाईम्स ३०० टाईम्स ,१५० टाईम्स लावते. आणि कंपनी नॉमिनल फक्त २० टक्के ,१० टक्के वर लावते.

**रुंदन राठोड :-**

आपण रेप्युटेड कंपन्यांचेच घेतले आहेत. रेनबॅक्सी, आल्केम, सिप्ला त्यामुळे कंपनीचे रेट थोडे जास्त असतील. आता कंपनीमध्ये एवढा फरक पडतो की, आपण एखाद्या डेंझामीकॅरोन डिकॅटोन जे इंजेक्शन आहे. ते जर एखाद्या साध्या कंपनीचे घेतले तर दोन रुपयांत मिळते तेच जर चांगल्या कंपनीचे घेतले तर तेच इंजेक्शन दहा रुपयांत मिळेल. असा फरक पडतो.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, दोन रुपये आणि दहा रुपये एवढा फरक पडत नाही.

**रुंन्दन राठोड :-**

सध्या कंपनीचा आणि स्टँडर्ड कंपन्यांचा खुप फरक पडतो.

**मा. आयुक्त :-**

आपण जो रेट आणलेला आहे तो कुठल्या कंपनीचा आणलेला आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

सोलोकॅड कंपनीचा रेट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काल डॉ. रमेश जैन आपल्या बरोबर होते. डॉ. रमेश जैन स्वतः बोलले की, ह्याच्यामध्ये जे टेंडरचे रेट आलेले आहेत. त्याच्यापेक्षा ५० टक्के कमी दराने सप्लाय करायला तयार आहेत. तुम्ही मेडिसीन मध्ये जर गेलात तर एखादी कंपनी रॅनबॅक्सी पण सेम प्रोडक्ट मॅन्युफॅक्चर करते. सिप्लापण सेम मॅन्युफॅक्चर करते. अशा दोन तीन कंपन्या वेगळ्या असतात. आता सिप्लापण त्याच कॅटेगिरीमध्ये आहे आणि रॅनबॅक्सीपण त्याच कॅटेगिरीमध्ये आहे. फक्त मिस गाईड झाले. हे डॉ. रमेश जैन स्वतः बोललेले आम्हाला याच्यामध्ये काही माहिती नाही. त्यांनी सांगितले की, ही जी फिगर आहे याच्यामध्ये सिझर आहे. त्याची कॉस्ट रु. ४९३/- ही ते बोलतात की, मी माझ्याकडे मॅक्झीमम रु. १५०/- मध्ये वापरतो. त्याच्यामध्ये एक राऊंड टेबल स्टूल आहे. त्याच्यामध्ये स्टूलची किंमत रु. २४००/- सांगितली आहे. हा स्टूल ७००-८०० रुपयांमध्ये मिळतो. डॉ. रमेश जैन स्वतः बोलले.

**हंसूकूमार पांडे :-**

ग्लोजचे दिडशे रुपये जोडी आहे. त्याला रु. ४४३/- लावले.

**एस. ए. खान :-**

एवढे महाग आपण वापरणार का?

**हंसुकूमार पांडे :-**

डिस्पोजल निडल रु. ८०/- आहे. रु. २२०/- लावले. हे तुम्ही परत मागवा.

**एस. ए. खान :-**

टेंभा हॉस्पीटलला गेले तर तिकडे कोण नसते आणि चारशे रुपयाचे ग्लोज? बॉम्बे हॉस्पीटलवाले असे वापरत नाही.

**संदिप शिंदे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. ही सर्व औषधे जी आहेत ती सर्व आपण वापरतो.

**हंसुकूमार पांडे :-**

लेकिन आजतक किसीने ध्यान नही दिया। अभी ध्यान दिया तो बोलते है। आज तक वापरते थे। तीन गुना रेट लगाते थे। आज नही लगा सकते। आज हम बोल रहे है।

**एस. ए. खान :-**

गोरगरिब येणार आहेत. त्यांच्यासाठी रु. २८००/- चा स्टूल, बसण्यासाठी आपल्या घरी तरी रु. २८००/- चे स्टूल आहेत का?

**हंसुकूमार पांडे :-**

डॉक्टर साहेब, रिवॉल्वींग स्टूल साडे सात सौ रुपये का आता है। उसका रु. २४७२/- लगाया है। मा. सभापती साहेब, आपको कैसा लग रहा है?

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, या ज्या किंमती दिलेल्या आहेत. त्याची परत एकदा पडताळणी करा आणि आणि आपण जो आरोग्य विभाग चालवतो. तिकडे चांगल्या कंपनीची औषधे पाहिजे. जेणेकरुन, बाजारामध्ये भरमसाठ अशी डुप्लीकेट औषधेसुद्धा येतात. तशा पद्धतीने कुठलाही धोका आपल्या महापालिकेला होऊ नये किंवा त्या निमित्ताने महापालिका बदनाम होऊ तरीसुद्धा एक वेळ ह्या सगळ्या ज्या किंमती आहेत त्याची पडताळणी करुन त्याच्यावर निश्चितपणे निर्णय घ्या. सभागृहाचे सध्या जे मत आहे की, जास्त किंमती लावल्या गेल्या आहेत. तर आपण परत एकदा...

**एस. ए. खान :-**

सगळे सफेद गोळ्या तर देणार नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

पेशंट के लिये ऐसा रिस्क कोई डॉक्टर नही लेगा। डॉक्टर जो भी गोली देता होगा। अच्छा गोली देता होगा। डॉक्टर लोग का रेट है की, यह रेटस मे यह चिज आता है। और इसमे तीन गुना ज्यादा रेट लगाया है।

**संदिप शिंदे :-**

त्याची क्वॉलिटी असते.

**हंसुकूमार पांडे :-**

डॉक्टर पण चांगलीच क्वॉलिटी देतात. नही तो पेशंट ठिक कैसे होंगे।

**गिता जैन :-**

साहेब, मला एक सांगा. तुमचे असे सांगणे आहे की, प्रायव्हेट डॉक्टर जरा कमी वापरतो आणि आपण त्यांच्यापेक्षा सुपर क्वॉलिटी वापरु.

**संदिप शिंदे :-**

आपल्याकडे रेनबॅक्सीचे आहेत, सिप्लाचे आहेत....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काल डॉ. रमेश जैन ह्यांनी स्वतः सांगितले. ते प्रॅक्टीस करतात. ते काही आम्हाला माहिती नव्हते. ते आजही प्रॅक्टीस करतात. त्यांची डिस्पेन्सरी चालू आहे. ते सुद्धा औषधे आणतात, तेसुद्धा सिरींज आणतात, तेसुद्धा निडल्स आणतात, ग्लोज आणतात, कॉटन आणतात, टींचर आणतात. पण त्यांनीच सांगितले.

**गिता जैन :-**

दे आर मोअर रिस्पॉन्सीबल दॅन सरकारी डॉक्टर्स तिथे पुर्ण जबाबदारी त्यांची आहे. टेंभावर तुम्ही सांगणार की, हा पेशंट आमचा नव्हता. त्यांचा होता. त्याने बघितली. असे झाले, तसे झाले. प्रायव्हेट डॉक्टर तसे करुच शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आत्ताच श्री. खतगांवकर साहेबांनी सांगितले की, आठ लाख डॉक्युमेंट्रीचा रेट होता. आपण डिस्कशन करुन कमी केला होता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बारा लाखाच्या निविदा आल्या होत्या. आम्हाला ते काही पटले नाही. साहेबांनी ते रद्द केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्हाला डॉक्युमेंट्रीबद्दल एक्सपरिएन्स होता का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

डॉक्युमेंट्रीचा नाही. तुम्ही विषयांतर करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझा बोलण्याचा उद्देश असा आहे की, डॉक्युमेंट्री फिल्म बनविण्याची कंपनीची निविदा जी आली होती. ती बारा लाखाची आली होती. तुम्हाला विदाउट एक्सपीरएन्स डिस्कशन करुन ती आठ लाखावर आणली. चार लाखाचा महापालिकेचा फायदा केला. तर हे डॉक्टर प्रॅक्टीस करतात. ह्यांना एवढे माहिती नाही की, सिरींज कितीला मिळते? मेडिसिन्स कितीला मिळतात? ॲटलिस्ट निगोशिएशन केले पाहिजे ना? आमचे

असे म्हणणे नाही. साहेब, माणूस धंदा करतो. दोन पैसे कमवतो. ही महापालिका आहे. पेमेंट लेट होतो, त्याला इंटरेस्ट लागतो. पण एवढे डबल-ट्रिपल नाही आला पाहिजे अशी आमची भावना आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

साहब, आप बोलते हो की, इसमे रॅनबॅक्सी का मटेरियल है।इसमे कही भी रॅनबॅक्सी का नाम ही नही है। मॅन्युफॅक्चर्ड बाय सोलो कॅड है, आर्यन एन्टरप्राईजेस है, झी स्पिरीट है। एम.के.टी. गॅलेक्सी एन्टरप्रायजेस और छोटे-छोटे कन्सर्न का है। रेप्युटेड कन्सर्न का मटेरियल कहाँ है?

**रुंन्दन राठोड :-**

रॅनबॅक्सी, सिप्ला है।

**हंसुकूमार पांडे :-**

साहब, यह मेडिसीन पर चर्चा होना जरुरी है। आप विषय वापस अगली बार लिजिए। याची निविदा परत मागवा. सभापती साहब, आज जो गोषवारा आया है वह हम लोगो को मंजूर नही है। मैं चाहताँ हू इसकी निविदा वापस मंगाई जाये ऐसा मेरा ठराव है।

**शशिकांत भोईर :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

निविदा परत मागवून जरा व्यवस्थित येऊ द्या.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांनी ठरावाची खात्री करावी असा मी आदेश देतो.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अवलोकनासाठी आपल्यासमोर विषय ठेवलेला आहे आणि अवलोकन करत असताना प्राप्त निविदांचे जे दर आहेत. त्या दरांबद्दल सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याची मी स्वतः खात्री करेन तोपर्यंत त्यांना पेमेंट अदा केले जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

**हंसुकूमार पांडे :-**

कौनसा कंपनीका आता है वह भी हम लोगों को दिखाना जरुरी है। रॅनबॅक्सी बोलते है, सिप्ला बोलते है। यह कोई भी मेंन्शन दिखता नही।

**मा. सभापती :-**

दिखाने के लिये सॅम्पल या दो बॉटल लाकर देते है। ऐसा नही चलता है। थोडा तो विश्वास रखना चाहिए।

**हंसुकूमार पांडे :-**

लेकिन जो ब्रॅडेड कंपनी है, उसिका नाम लिया जाता है। और मंजूरी लिया जाता है। लेकिन बाकीके सब ब्रॅडेड नही है। फिर भी उसका रेट तीन गुना है।

**मा. सभापती :-**

मैने आदेश दिया। मा. आयुक्त महोदय जाँच-पडताल करेंगे और उस हिसाब से डिसीजन देंगे।

**हंसुकूमार पांडे :-**

हमको मंजूर है।

**प्रकरण क्र. १६३ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १६६ :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक उपकरणे व साहित्य पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे. महावीर मेडीकल सप्लायर्स मे. लोटस एंटरप्रायझेस, मे. ए. पी. एन्टप्रायझेस, मे. लाधानी मेडीकल सप्लायर्स, या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यांनी निविदेत खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| Sr. No. | Description | MAHAVIR MEDICAL SUPPLY | | | LOTUS ENTERPRISES | | | A. P. ENTERPRISES | | | LATHANI MEDICAL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | ***Rate*** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** |
| 1. | Disp. Syringe 5cc with Needle | 1 Box X 100 Sy. | Rs. 689 | Solocare | 1 Box X 100 Sy. | Rs. 700 | Albert Devis | 1 Box X 100 Sy. | Rs. 805 | Medisafe | 1 Box X 100 Sy. | Rs. 745 | Pricon India Ltd. |
| 2. | Disp. Syringe 2cc | 1 Box X 100 Sy. | Rs. 450 | Solocare | 1 Box X 100 Sy. | Rs. 500 | Albert Devis | 1 Box X 100 Sy. | Rs. 679 | Medisafe | 1 Box X 100 Sy. | Rs. 545 | Pricon India Ltd. |
| 3. | Hydrogen Peroxide 400 ml. | 450ml. X 1 Bottle | Rs. 21.69 | Arihant Enterprise | 450ml. X 1 Bottle | Rs. 22 | Albert Devis | 450ml. X 1 Bottle | Rs. 34 | Medisafe | 450ml. X 1 Bottle | Rs. 26 | Pricon India Ltd. |
| 4. | Clinical Spirit 100 ml | 100ml. X 1 Bottle | Rs. 16 | Zee Sprit | 100ml. X 1 Bottle | Rs. 24 | Albert Devis | 100ml. X 1 Bottle | Rs. 29 | Medisafe | 100ml. X 1 Bottle | Rs. 25 | Pricon India Ltd. |
| 5. | Sticking Plaster 1cm. | 1.25cm X 74 Spools X 1 Box | Rs. 1000 | Chetan polytex Pvt. Ltd. | 15cm. X 74 Spools X 1 Box | Rs. 1100 | Albert Devis | 1.25cmX 74 Spools X 1 Box | Rs. 2376 | Medisafe | 125cm. X 74 Spools X 1 Box | Rs. 1154 | Pricon India Ltd. |
| 6. | Cotton Bandage – 4cm X 4 meter X 12 | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 118 | M. K. T. Galaxy Enterprise | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 120 | Albert Devis | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 185 | Medisafe | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 154 | Pricon India Ltd. |
| 7. | Cotton Bandage - 6cm X 4 meter X 12 | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 132 | M. K. T. Galaxy Enterprise | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 135 | Albert Devis | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 195 | Medisafe | 12 rolls X 1 Pkt. | Rs. 165 | Pricon India Ltd. |
| 8. | Absorbent Cotton – 1 X 100 gm | 1.25gm X 1 Pkt. | Rs. 35.50 | M. K. T. Galaxy Enterprise | 1.25gm X 1 Pkt. | Rs. 48 | Albert Devis | 1.25gm X 1 Pkt. | Rs. 37.50 | Medisafe | 1.25gm X 1 Pkt. | Rs. 36.80 | Pricon India Ltd. |
| 9. | Scissors 6” | 1 Scissors 6” | Rs. 493 | A.I.S. exp. | 1 Scissors 6” | Rs. 540 | Albert Devis | 1 Scissors 6” | Rs. 600 | Medisafe | 1 Scissors 6” | Rs. 549 | Pricon India Ltd. |
| 10. | Normal Saline | 500ml. X 1 Bottle | Rs. 16.95 | Nirlif Health Care | 500ml. X 1 Bottle | Rs. 18 | Claris | 500ml. X 1 Bottle | Rs. 20 | - | 500ml. X 1 Bottle | Rs. 20 | Bhravn |
| 11. | Disp. Gloves 6, 6½, 7 | 50 Pair X 1 Box | Rs. 1437 | Parkin Glores | 50 Pair X 1 Box | Rs. 1800 | Jayman Corporati | 50 Pair X 1 Box | Rs. 2000 | Para Surgical | 50 Pair X 1 Box | Rs. 2000 | Bhravn |

| Sr. No. | Description | MAHAVIR MEDICAL SUPPLY | | | LOTUS ENTERPRISES | | | A. P. ENTERPRISES | | | LATHANI MEDICAL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | ***Rate*** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** |
| | | | | | | | on Ltd. | | | | | | |
| 12. | Disp. Gloves (Non Sterile) | 25 Pair X 1 Box | Rs. 443 | Parkin Glores | 25 Pair X 1 Box | Rs. 800 | Jayman Corporati on Ltd. | 25 Pair X 1 Box | Rs. 900 | Para Surgical | 25 Pair X 1 Box | Rs. 600 | Bhravn |
| 13. | Disp. Needle No. – 23, 24, | 100 needles X 1 Box | Rs. 220 | B. D. Needles | 100 needles X 1 Box | Rs. 325 | Nipro Needles | 100 needles X 1 Box | Rs. 345 | Medisafe | 100 needles X 1 Box | Rs. 275 | Pricon India Ltd. |
| 14. | Lysol (Without Soap) 450 Ml | 450ml. X 1 Bottle | Rs. 67 | Sun-ag-Pharma | 450ml. X 1 Bottle | Rs. 75 | - | 450ml. X 1 Bottle | Rs. 105 | Medisafe | 450ml. X 1 Bottle | Rs. 99 | Pricon India Ltd. |
| 15. | Liquid Sevlon 500ml | 1 Lit X 1 Bottle | Rs. 99.50 | Unicom (Zelon) | 1 Lit X 1 Bottle | Rs. 145 | - | 1 Lit X 1 Bottle | Rs. 180 | Medisafe | 1 Lit X 1 Bottle | Rs. 150 | Pricon India Ltd. |
| 16. | Tincture Benzoin Compound 450 Ml | 400 ml. X 1 Bottle | Rs. 100 | Coral | 400 ml. X 1 Bottle | Rs. 130 | - | 400 ml. X 1 Bottle | Rs. 180 | Medisafe | 400 ml. X 1 Bottle | Rs. 125 | Pricon India Ltd. |
| 17. | Revolving Stool S.S. Top | 1 stool | Rs. 2472 | A.I.S. exp. | 1 stool | Rs. 2895 | National Steel | 1 stool | Rs. 3045 | B. Patel & Company | 1 stool | Rs. 3599 | Pricon India Ltd. |
| 18. | S.S. Two Cell Torch With Cell | 1 Touch 2 Cell | Rs. 345 | Geep | 1 Touch 2 Cell | Rs. 485 | Eveready | 1 Touch 2 Cell | Rs. 580 | B. Patel & Company | 1 Touch 2 Cell | Rs. 542 | Pricon India Ltd. |
| 19. | Ant Wall Retractor | 1 Pcs | Rs. 607 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 740 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 895 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 699 | Pricon India Ltd. |
| 20. | Post Wall Retractor | 1 Pcs | Rs. 1297 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 1450 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1450 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1520 | Pricon India Ltd. |
| 21. | Vulsellum | 1 Pcs | Rs. 994 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 1240 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1200 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1450 | Pricon India Ltd. |

| Sr. No. | Description | MAHAVIR MEDICAL SUPPLY | | | LOTUS ENTERPRISES | | | A. P. ENTERPRISES | | | LATHANI MEDICAL | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | ***Rate*** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** |
| 22. | Sim's Speculum | 1 Pcs | Rs. 986 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 1195 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1350 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1345 | Pricon India Ltd. |
| 23. | Uterine Sound | 1 Pcs | Rs. 879 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 990 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1250 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1895 | Pricon India Ltd. |
| 24. | Artery Foceps | 1 Pcs | Rs. 942 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 950 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1250 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1800 | Pricon India Ltd. |
| 25. | Illuminating Light | 1 Pcs / with stand | Rs. 3395 | A.I.S. exp. | 1 Pcs / with stand | Rs. 3875 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs / with stand | Rs. 4950 | B. Patel & Company | 1 Pcs / with stand | Rs. 4790 | Pricon India Ltd. |
| 26. | Kidney Tray | 1 Pcs | Rs. 880 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 992 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1195 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1195 | Pricon India Ltd. |
| 27. | Tray 8” X 3” | 1 Pcs | Rs. 1165 | A.I.S. exp. | 1 Pcs | Rs. 1435 | K. L. K. Pvt. Ltd. | 1 Pcs | Rs. 1895 | B. Patel & Company | 1 Pcs | Rs. 1875 | Pricon India Ltd. |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. महावीर मेडीकल सप्लायर्स यांनी साहित्य व उपकरणे पुरवठा करणेकामी सादर केलेले दर तिन्ही निविदाकारांच्या तुलनेत कमी आहे. मा. आयुक्त यांनी मे. महावीर मेडीकल सप्लायर्स यांनी सादर केलेली निवीदेतील दर मंजुर केले आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मंजुरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १६४ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १६४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग),

**ठराव क्र. १६७ :-**

महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक औषधे पुरवठा करणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या त्यास प्रतिसाद मिळून मे. सागर एन्टप्रायझेस, मे. विहार केमिस्ट ॲन्ड जनरल स्टोर्स, मे. भैरव मेडीकल ॲन्ड जनरल स्टोर्स, मे. शाहा फार्मा या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्या. त्यांनी निविदेत खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| Sr. No | Description | SAGAR ENTERPRISES | | | VIHAR CHEMIST AND GENERAL STORE | | | BHAIRAV MEDICAL & GENERAL STORE | | | SHAH PHARMA | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Packing** | **Rate** | ***Mfg by*** | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** | **Packing** | **Rate** | **Mfg by** |
| 1. | Tab. Amoxicilline 500mg. | 1 x 10 | Rs. 54.00 | Galpha / Alkem | 1 X 10 | Rs. 55.00 | Alkem | 1 X 10 | Rs. 57.00 | Alembic | 1 X 10 | Rs. 57.80 | German Renedies |
| 2. | Tab. Ofloxacin 200 mg. | 1 X 10 | Rs . 55.00 | Galpha / Alkem | 1 X 10 | Rs. 58.00 | Alkem | 1 X 10 | Rs. 57.00 | Aurbindo | 1 X 10 | Rs. 56.00 | Alembic / Cipla |
| 3. | Tab. Ibuprofen 400 mg. + Paracetamol 325 mg. | 1 X 1000 | Rs. 465.00 | Ronillo / Camo | 1 X 1000 | Rs. 495.00 | Vikas | 1 X 1000 | Rs. 550.00 | Vikas | 1 X 1000 | Rs. 500.00 | Vikas |
| 4. | Tab. Diclofenac Sodium 50 mg. | 1 X 1000 | Rs. 85.00 | Galpha / Alkem | 1 X 1000 | Rs. 105.00 | Vikas | 1 X 1000 | Rs. 950.00 | Ronillo | 1 X 1000 | Rs. 100.00 | Vikas |
| 5. | Syp. Paracetamol 100 mg. | 1 X 60 ml. | Rs. 15.00 | Galpha / Alkem | 1 X 60 ml. | Rs. 16 .00 | Elder | 1 X 60 ml. | Rs. 20.00 | Cadila | 1 X 60 ml. | Rs. 18.00 | Novus |
| 6. | Diclofenac Gel 10 gm. | 1 X 10 gm. | Rs. 15.00 | Galpha / Alkem | 1 X 10 gm. | Rs. 16.50 | Nicholos | 1 X 10 gm. | Rs. 20.00 | Nicholas | 1 X 10 gm. | Rs. 17.50 | Omega |
| 7. | Tab. Erythromycin 500 mg. | 1 X 10 | Rs. 45.00 | Galpha / Alembic | 1 X 10 | Rs. 47.00 | Galpha | 1 X 10 | Rs. 50.00 | Aurbindo | 1 X 10 | Rs. 48.50 | Ranbaxy |
| 8. | Tab. Albendazole 400 mg. | 1 X 1 | Rs. 12.00 | Galpha / Alkem | 1 X 1 | Rs. 15.00 | Cadila | 1 X 1 | Rs. 15.00 | Galpha | 1 X 1 | Rs. 14.00 | Cipla |
| 9. | Syp. Albendazole 200 mg. / 10 ml. Bottle | 1 X 10 ml. | Rs. 16.00 | Galpha / Cadila | 1 X 10 ml. | Rs. 17.50 | Cadila | 1 X 10 ml. | Rs. 20.00 | Galpha | 1 X 10 ml. | Rs. 18.00 | Cipla |
| 10. | Tab. Domperidone 10 mg. | 1 X 10 | Rs. 18.00 | Galpha / Cadila | 1 X 10 | Rs. 24.00 | Vipul | 1 X 10 | Rs. 25.00 | Vikas | 1 X 10 | Rs. 21.00 | Elder |
| 11. | Inj. Diclofenac Sodium | Per / Amp | Rs. 3.75 | Alkem / Ranbasy | 1 X 2 ml. | Rs. 4.00 | Renbaxy | 1 X 1 | Rs. 4.00 | Ranbaxy | Amp | Rs. 4.00 | Indswift |
| 12 | Inj. Ranitidine | Per / Amp | Rs. 2. 10 | Alkem / Ranbasy | 1 X 2 ml. | Rs. 3.00 | Renbaxy | 1 X 1 | Rs. 3.50 | Ranbaxy | Amp | Rs. 2.35 | Indswift |
| 13 | Tab. Theophylline 150 mg. | 1 X 10 | Rs. 4.00 | Cilpla | 1 X 10 | Rs. 6.00 | German Renedies | 1 X 10 | Rs. 10 | German Renedies | 1 X 10 | Rs. 4.35 | German Renedies |

वरील तक्त्याचे अवलोकन करता मे. सागर एन्टप्रायझेस यांनी औषध पुरवठा करणेकामी सादर केलेले दर तिन्ही निविदाकारांच्या तुलनेत कमी आहे. मा. आयुक्त यांनी मे. सागर एन्टप्रायझेस यांनी सादर केलेली निवीदेतील दर मंजुर केले आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मंजुरी दिलेली आहे. सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या पालिकेमध्ये जे कम्प्यूटर आले ते एच. सी. एल. आणि एच.पीचे आले आहेत. आपल्याकडे आणखीन एच.सी.एल. आणि एच.पी. कम्प्यूटर आहेत आणि प्रिंटरसुद्धा आहेत. त्याच्यामध्ये आणि ह्याच्यामध्ये फरक आहे. तुम्ही सुद्धा बघा. एच.सी.एल. चे आणि एच.पी. चे लेबल सेम आहे. पण इंटरनल फरक आहे. कदाचित हे असेंम्बल केल्याचा डाऊट आहे. कारण आपल्या पालिकेमध्येसुद्धा एच.सी.एल आणि एच.पी चे प्रिंटर आणि कम्प्यूटर आहेत. आणि आत्ता जे सप्लाय होतात. त्याच्यामध्ये आणि याच्यामध्ये फरक आहे.

**मा. सभापती :-**

फरक म्हणजे नव्यामध्ये आहेत की, जुन्यामध्ये फरक आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नवीनच आहेत. पण साहेब, कधी कधी कम्प्यूटर असेम्बल केले जातात. एखाद्या नामांकित कंपनीचा कम्प्यूटर आणि असेंम्बल कम्प्यूटर याच्यामध्ये फरक असतो. आणि मॉनिटर आपण त्या कंपनीचा आणला आणि त्याच्या आतमध्ये दुसरे स्पेअर पार्ट टाकले. असेम्बल होऊ शकतो. मा. सभापती साहेब, माझी अशी विनंती आहे. आपण तुमच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमूया. आणि त्या उपसमितीमध्ये हे जे डाऊटफूल विषय आहेत त्याची त्या लोकांनी पडताळणी करावी.

**शशिकांत भोईर :-**

अधिनियम २४ नुसार मला वाटते त्याचा पोटकलम २ असेल. त्या उपसमितीवर तीन सदस्यांची नेमणूक करावी. अधिनियम २४ अन्वये कार्यवाही व्हावी. कलम २४ पोटकलम २ नुसार स्थायी समितीला अधिकार आहे. तीन सदस्यांची एक उपसमिती नेमावी.

**जेन्वी अल्मेडा :-**

प्रकरण १६१ मंजूर आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, एक सुचना दिलेली की, कलम २४(२) नुसार एक उपसमिती नेमावी.

**मा. सभापती :-**

पुढच्या वेळेला हा विषय काय आहे ते मी तुम्हांला सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझा एक पाणी पुरवठ्याचा विषय होता.

**प्रकरण क्र. १६१ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १६४ :-**

**विषय :- संगणक विभागाकरिता संगणक संच व साहित्य खरेदी करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालयातील विविध विभागांकरिता संगणक संच व साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. महासभा दि. २०/०१/२००६ मधील ठराव क्र. ८६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दि. ०७/११/२००६ रोजी दै. सामना व दै. सागर या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार एकूण चार ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत. त्यापैकी मे. वेबसर्फ प्रा. लि. यांनी सादर केलेल्या आपल्या निविदेसोबत निविदा अटीशर्तीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली, पात्र निविदा धारकांच्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | कंपनिचे नाव | मे. के. जी. एम. कॉम्प्युटर्स | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. निलेश क्रिएशन |
|---|---|---|---|---|---|
| १. | Intel Pentium 4 Processor 2.26 GHz or Higher with 400 Mhz FSB support with 512 KB Cache/845 Intel chipset Motherboard/256 MB DDR/80 GB HDD/1.44 MB FDD/ 52 X CD-ROM / ATX Cabinet with SMPS/ Standered Keyboard/ Two Button Plus Scroll Mouse / 15" Color Moniter, On board LAN | HCL | ३५,९००/- | ३५,८७५/- | ३५,९२५/- |
| २. | Laser Printer, Total Merory 48 MB or Higher, 22 PPM or Higher | HP | २२,७५०/- | २५,७००/- | २५,७२५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी व वाजवी असल्याने सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. महानगरपालिकेकरिता संगणक व प्रिंटर्स पुरवठा करणेकामी रू. ८,६२,०५०/- खर्चास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

**सही /-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, मनपा अधिकारी आणि कर्मचारी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली त्या बद्दल धन्यवाद. आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.२५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**